# प्रकरण चौथे

## उपसंहार

# उपसंहार

आपला भारत देश कृषिप्रधान देश आहे. संपूर्ण देशामध्ये शेतीचा अधिकाधिक विकास व्हावा व इतर औद्योगिक क्षेत्रातही विकास व्हावा या हेतून आपल्या महाराष्ट्र राज्यात राज्य सरकारने अनेक पंचवार्षिक योजना राबविल्या. या पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीविकासाला प्राधान्य देण्यात आले व त्यासाठी योग्य ठिकाणी धरणे बांधली पाहिजेत असे ठरविण्यात आले. या ठरावानुसार ज्या भागात धरण बांधून पाण्याचा साठा करता येतो त्या त्या ठिकाणी धरण बांधली गेली. परिणामी शेतीचा विकास झाला.

शेतीचा विकास झाला हे जरी खरे असले तरी बांधलेली धरणे ज्यांच्या जमिनीवर बांधली आहेत त्यांचा विचार मात्र राज्य सरकारने केला नाही या धरणग्रस्तांना फक्त आश्वासने मिळत गेली आणि धरणे बांधली गेली. वेळ काळ बदलत गेला आणि धरणग्रस्तांचे अनेक गंभीर समस्या दत्त बनून आपणासमोर उभा राहिल्या त्या समस्या कादंबरी वाङ्मयात मांडण्याचा प्रयत्न काही लेखकांनी केली. त्या समस्यांचा अभ्यास करण्याकरिता प्रा. चंद्रकुमार नलगे यांची 'देवाची साक्ष', विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' या दोन कादंबऱ्या निवडल्या. या कादंबऱ्यातून ज्या काही धरणग्रस्तांच्या समस्या दिसून आल्या त्यांचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधामध्ये केलेला आहे.

प्रस्तुत प्रबंधामध्ये एम्. फिल संशोधनासाठी मराठीतील धरणग्रस्तांच्या समस्या रेखाटणाऱ्या कादंबऱ्या एक भ्यास 'देवाची साक्ष' व 'झाडाझडती' यांच्या अनुषंगाने हा विषय धरणग्रस्तांच्या समस्यांवर प्रकाश टाकण्यासाठी निवडला आहे. प्रस्तुत प्रबंधाचा अभ्यास मुख्य तीन प्रकरणात केला असून उपसंहारात चौथ्या प्रकरणात निष्कर्ष सादर केला आहे.

मराठी कादंबरी तात्विक चर्चा व विकास हे पहिले प्रकरण आहे. या पहिल्या प्रकरणामध्ये मराठी कादंबरीचा आढावा घेतलेला आहे. यात कादंबरी शब्दाची उत्पत्ती, कादंबरीच्या व्याख्या, कादंबऱ्यांचे प्रकार, मराठी कादंबरीचा विकास याचे स्पष्टीकरण केले. कादंबरी शब्दाची उत्पत्ती कशी झाली. मराठी वाङ्मयात कादंबरी शब्द कसा रुढ झाला याचे स्पष्टीकरण कादंबरी शब्दाच्या

उत्पत्तीमध्ये केले आहे. कादंबरी हा मोठा विषय असल्याने कादंबरीला व्याख्येत बांधणे फार कठीण काम झाले. तरीही काही अभ्यासकांनी कादंबरीला व्याख्येत बांधण्याचा प्रयत्न केला. त्या व्याख्यांचा अभ्यास कादंबरीच्या व्याख्या या मुद्यात केला आहे. या व्याख्यांमध्ये पाश्चात्य साहित्यिक, हिंदी साहित्यिक, मराठी साहित्यिक यांच्या काही व्याख्या घेतलेल्या आहेत.

कादंबरीचा जो विकास झाला त्याला कादंबरीचे प्रकार कारणीभूत असल्याने कादंबऱ्याचे प्रकारही येथे अभ्यासले आहेत. कादंबरीचा विकास अनेक प्रकारातून झाला. उदा. ग्रामीण, प्रादेशिक कादंबरी, सामाजिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, चरित्रपर कादंबरी, वास्तववादी कादंबरी इत्यादी प्रकार उदयास आले. आजही कादंबऱ्याचे नवनवे प्रकार उदयास येण्याच्या मार्गावर आहेत. उदा. वैज्ञानिक कादंबरी. कादंबरीच्या प्रकारानंतर बाबा पद्मनजींच्या यमुनापर्यटन या कादंबरीपासून ते आजपर्यंत मराठी वाङ्मयात ज्या लेखकांनी कादंबरी लेखन करून कादंबरीचा विकास घडवून आणला त्याची चर्चा केली आहे. या विकासात सर्वच लेखकाचा आढावा घेणे शक्य नसल्याने काही महत्वाच्या लेखकांचा आढावा घेतलेला आहे. कादंबरीकारांच्या कादंबऱ्यातून चित्रित केलेले सामाजिक विषय प्रादेशिकता त्यांची भाषाशैली इत्यादी विषयाला अनुसरून चर्चा केली आहे.

प्रकरण दोनमध्ये प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा एक यशस्वी लेखक म्हणून आणि विविध क्षेत्रात कार्य करणारी यशस्वी व्यक्ती म्हणून थोडक्यात परिचय घेतला असून पुढे त्यांची 'देवाची साक्ष' या कादंबरीचे वाङ्मयीन परीक्षणाच्या अनुषंगाने अभ्यास केलेला आहे.

त्यानंतर कादंबरीच्या कथानकामध्ये कादंबरीचे थोडक्यात कथानक घेतले असून त्या कथानकाला अनुसरून येणाऱ्या व्यक्तिरेखा त्यांचाही अभ्यास केला. त्या व्यक्तिरेखा कादंबरीत येत असताना कशा दिसून येतात. त्यांचे सामाजिक जीवन भेद-भाव, सहनशीलता, राग, द्वेष सहकार्याची वृत्ती कशी चित्रित केलेली आहे. हे त्या त्या व्यक्तिरेखेनुसार अभ्यासले आहे. नंतरच्या मुद्यात कादंबरीमध्ये धरणग्रस्तांच्या दिसून येणाऱ्या समस्यांचा अभ्यास केला. यात धरणग्रस्तांच्या ज्या काही समस्या दिसून आला त्यांचे स्पष्टीकरण केले. उदा. आर्थिक समस्या,

जमीन समस्या, पाणी समस्या, वीज समस्या, आरोग्य समस्या, शैक्षणिक समस्या इत्यादी अनेक समस्या या कादंबरीत दिसून आल्या. त्यांची चर्चा केली. वाङ्मयीन परीक्षणामध्ये कादंबरीचे कथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती, संवाद पद्धती, भाषाशैली इत्यादी मुद्यांचा विचार केला.

या कादंबरीत ज्या लोकांच्या जमिनीवर धरण बांधले जाते त्या लोकांना स्वतःचा गाव, घर, शेती सर्व सोडून सरकारन दिलेल्या माळरानावर जाऊन रहावे लागते. तिथे त्यांना अनेक चांगल्या - वाईट घटणांशी संघर्ष करून जीवन जगावे लागते. जे प्रसंग घडायला नको होतो तेही प्रसंग त्यांच्या वाट्याला येतात. उदा. बलात्कार, खून, अनैतिक संबंध इ. आणि हे सर्व देवाच्या साक्षीने घडलेले आहे.

आपल्यावर अन्याय होत आहे याची जाणीव अनेक लोकांना असते, परंतु ते अन्यायाला वाचा फोडू शकत नाहीत. स्वतःवर होणारा अन्याय ते निमूटपणे सहन करताना दिसून येतात.

तिसऱ्या प्रकरणात विश्वास पाटील यांच्यां 'झाडाझडती' ही सत्यघटनेवर लिहिलेल्या कादंबरीचा अभ्यास केला. या प्रकरणात प्रस्तावनेमध्ये लेखकाची थोडक्यात ओळख करून दिली आहे. पुढील मुद्यात 'झाडाझडती' कादंबरीचे कथानक दिले आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या व्यक्तिरेखांचाही अभ्यास केला. ही कादंबरी एका नायकाची किंवा नायिकेची नसून ती एका समुहाची कादंबरी आहे. हे त्यातील कथानक व व्यक्तिरेखावरून दिसून येते. या कादंबरीत धरणग्रस्तांच्या ज्या समस्या दिसून आलेल्या आहेत त्यांचा आढावा घेतला आहे. मग ती कोणतीही समस्या असू दे. जीवनावश्यक वस्तुपासून ते वीज, रस्ते, स्मशानभूमी पर्यंतच्या अनेक समस्या यात आहेत. पुढे या कादंबरीचे वाङ्मयीन दृष्टीने चर्चा केली आहे.

'झाडाझडती' ही वास्तववादी कादंबरी असल्याने यात काल्पनिकतेला व योगायोगाला लेखकाने वाव दिलेला नाही. या कादंबरीत म्हाकू, हैबती, शेवंता इ. यासारखी तरणी पोरपोरी असताना एकही 'गुलाबी प्रकरण' दिसून येत नाही. या कादंबरीतून लेखकाने ग्रामीण जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडवून वाचकांना सामाजिक समस्येची जाणीव करून दिली आहे. ग्रामीण जीवनावर जरी कादंबरी आधारीत असलीतरी ती ग्रामीण कादंबरी किंवा नायक (खैरमोडे गुरुजी)

दलित असल्याने ती दलित कादंबरी आहे असे कोणी तिचे विभाजन केले नाही.

धरण बांधणे हा विकासाचा पाया आहे. पण ज्यांच्या जमिनीवर धरण बांधल जाते त्यांची होणारी पिळवणूक, लबाडणूक करून आणि कायद्यात न बसणाऱ्या गोष्टी बसवून पुढारी व अधिकारी वर्ग स्वतःचे खिशे भरून घेतात. या प्रश्नांना उत्तर सापडत नाही. म्हणूनच लेखकाने 'झाडाझडती' कादंबरीचा शेवट अनुत्तरीत ठेवला आहे. याचे प्रत्यंतर कोयना धरणावरून येते. कोयना धरण बांधून आजमितीला पंचवीस वर्षे उलटली तरी अजुनही कोयनेतील धरणग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही. शासन अफाट पैसा खर्च करते. धरणग्रस्तांच्यासाठी काही सुविधा उपलब्ध करून देते. परंतु त्या सुविधा धरणग्रस्तांच्या पर्यंत पोहचत नाहीत. त्यांना त्याचा फायदा मिळत नाही.

महाराष्ट्र सरकारने याचा विचार केला पाहिजे. या घडणाऱ्या घटनाना शासन जबाबदार का समाज जबाबदार असा एक प्रश्न आपल्यासमोर उभा राहतो.

'झाडाझडती' कादंबरीच्या अगोदर बा. सी. मर्ढेकरांची 'पाणी', स. ग. यादव यांची 'बुडणारा गाव' व हिंदी लेखक रवी मिश्रा यांची (अप्रकाशित) 'मोहळ' या कादंबऱ्यामध्ये धरणग्रस्तांचा विषय आलेला आहे. पण त्यात पूर्ण कादंबरी ही धरणग्रस्तांवर आधारलेली आहे असे नाही. 'झाडाझडती' ही एकमेव कादंबरी पूर्णपणे धरणग्रस्तांवर आधारलेली दिसून येते. पाणी कादंबरी तसं पाहिलं तर सदबा शिवराम शिर्के या मराठमोळ्या शेतकऱ्याच्या कुटुंबाची कहाणी आहे. भगतपूर मध्ये सुखासमाधानात राहणारे कुटुंब पहिले महायुद्ध सुरु झाले तेव्हा सदबाचा मुलगा तुकाराम घरात कुणालाही न सांगता सैन्यामध्ये भरती होतो. युद्धात त्याचा डावा हात गमावल्याने तो आपल्या गावी परत येतो. तुकारामाचा मुलगा विठू हा त्याचा आशास्थान बनतो पण तोही नंतर दुसऱ्या महायुद्धात सर्वांना सांगून सैन्यात भरती होतो. या घटनेने पुन्हा त्यांच्या कुटुंबात तुकारामाच्य इतिहासाची पुनरावृत्ती होते एवढेच.

भगतपूरला कृष्णा नदीने एक समृद्ध कृषीजीवन दिले होते ते धरणामुळे विस्कटून जाते. औद्योगिक संस्कृती आली. तेव्हापासूनच कृषीजीवनावर व संस्कृतीवर अरिष्ट कोसळू लागले.

हळूहळू शेतकऱ्यांचे रुपांतर मजुरात होऊ लागले. ही जाणीव पाणी या कादंबरीतून व्यक्त होते. तीन पिढ्यांची ही धावती कथा दहा भागातून सांगितली. त्यापैकी तीन भागात धरणग्रस्तांचा विषय आहे. काही शेतकरी धरणांवर मजुरीचे काम करतात काही लोक मुंबईला गिरणीत नशीब उघडायला जातात. या धरणग्रस्तांच्यासाठी नवें विजेचे गाव वसवले जाणार होते. जमिनी गमावलेल्या शेतकऱ्यांना थोडीफार भरपाई मिळते. सत्याग्रह मोर्चे करणे व्यर्थ आहे हे या लोकांनी जाणवल्यामुळे त्यांनी व्यावहारिक तडजोड करावी लागते. एकंदरीत या कादंबरीत दोन महायुद्धाच्या कालावधीतील धरणप्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर भगत पूरमधील मराठमोळ्या कुटुंबाची सामाजिक वास्तवाचा संदर्भ असलेले कथानक कादंबरीत सांगितले आहे. यामुळे ही कादंबरी काही अंशी धरणग्रस्तावरील आहे हे स्पष्ट दिसून येते.

याच काळात इ. स. १९८३ ला रवी मिश्रा यांची 'मोहोळ' ही (हिंदीतील अप्रकाशीत) कादंबरी रेखा देशपांडे यांनी मराठीत अनुवाद करून प्रकाशीत केली. यातून ही रवी मिश्रा यांनी रेवती प्रकल्पाचा फटका बसलेल्या टाकळीतल्या अनेक कुटुंबाची कहाणी सांगितली आहे. टाकळीतील नव्वद टक्के कुटुंब सुपे गावठाणात घरे बांधून राहू लागतात. एक धरण आणि चिखली, धनेश्वर, महारवाडी, टाकळी या चार धरणग्रस्त गावे यांची एक संवेदनाक्षम मनाने टिपेलली कहाणी आहे. या कांदबरीत धोंडीबा आपल्या समस्यासाठी झगडतांना दिसतो तर कौशिक साहेब धरणग्रस्तांना काही सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

प्रा. स. ग. यादव यांनी काही प्रमाणावर धरणग्रस्तांच्या समस्यांचा आधार घेवून 'बुडणारा गाव' ही कादंबरी लिहिली. कानसा खोरा हा चांदोलीचा परिसर यात रेखाटला आहे. या कादंबरीत स.ग. यादव यांनी एका महाराजाच्या माध्यमातून कादंबरी साकारून एक वेगळा प्रयोग केला. बालयोगी महाराज लहानपणापासूनच ज्ञानी असतो. आपला सर्व गाव पाण्याखाली जाणार याची त्यांना माहिती असते. पण गावकऱ्यांना मात्र काहीच समजत नसते. बाल महाराज ही गोष्ट गावकऱ्यांना पटवून सांगू शकत नाहीत. एका स्त्रीमुळे महाराज बदनाम होतात. पण स्त्रीची चूक आहे हे गावकऱ्यांना समजताच त्या स्त्रीला गावकरी शिक्षा करतात. त्या दिवसाची बालयोगी महाराजांना भिती वाटत होती अखेर तो दिवस उगवतो आणि बघता बघता सारा खोरा रिकामा

होतो. धरणाची भिंत उभी राहते. गावातील लोक अडाणी, अशिक्षित असल्याने समस्यांची जाणीव असतानाही विरोध करीत नाहीत. माणसं हळूहळू पांगू लागतात. गाव उंठू लागतो, गुरंढोरं बरोबर घेवून मिरज, जत, आरग, बेडग, हुपरी, रेंदाळच्या माळावर नवं जीवन कसं असेल या चिंतेत जात असतात.

धरणग्रस्तांवरील कादंबऱ्यांचा अभ्यास करता 'झाडाझडती' ही जुनाविषय असलेली पण एका वेगळ्या पद्धतीने मांडलेली अशी कादंबरी आहे. पूर्ण कादंबरीचा विषय धरणग्रस्तांच्या समस्या रेखाटणारा असल्याने ती सत्यावर आधारल्याने यात योगायोगाला जागा नाही. यातून समाजात एक नवीन धरणग्रस्तांची जमात निर्माण होताना दिसून येते. ग्रामीण जीवनाची वास्तववादी पार्श्वभूमी लाभलेली अशी कादंबरी आहे. यातून ग्रामीण जीवनातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय भेदांचे वास्तववादी दर्शन घडते. म्हणून धरणग्रस्तांच्या समस्या रेखाटणारी 'झाडाझडती' ही वास्तववादी कादंबरी ठरते.

**⁂ निष्कर्ष : -**

ज्या भागात धरणे बांधण्यासाठी योग्य जागा आहे अशा ठिकाणी धरणे बांधली पाहिजेत. धरणे बांधून आपल्या भागाचा विकास घडवून आणणे चुकीचे नाही. धरणे बांधली तर आपल्या भागाचा चांगला विकास होवू शकतो. भागाभागाचा विकास झाला तर राज्याचा विकास होईल, राज्याचा झाला तर देशाचा होईल आणि आपला देश इतर देशांच्या स्पर्धेला सामना करू शकेल अन्यथा नाही. पण ती धरणे बांधण्यापूर्वी ज्या जागेवर धरण बांधायचे आहे त्या ठिकाणच्या लोकांचा (धरणग्रस्तांचा) प्रथम विचार केला पाहिजे. त्यांचे योग्य प्रकारे पुनर्वसन केले पाहिजे. नंतर धरण बांधले पाहिजे. प्रथम त्यांना आश्वासने द्यायची आणि धरण बांधून पूर्ण झाले की, त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचे ही वृत्ती नाहीशी झाली पाहिजे. सरकार ज्या ज्या योजना धरणग्रस्तांसाठी उपलब्ध करून देते त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचतील अशी यंत्रणा सरकारने राबविली पाहिजे. तरच आज दिसून येणारे धरणग्रस्तांचे आंदोलन नाहीशे होईल. त्यांच्या समस्यांचे निवारण केल्यास सरकारच्या योजनेमध्ये अडथळे निर्माण होणार नाहीत असे झाले तर पुढील काळात मोर्चे निघणार नाहीत.

अन्यथा धरणग्रस्तांविषयी विश्वास पाटील एक चर्चासत्रात म्हणतात -

''धरणे व्हायला हवीतच. विकासाचा मार्ग रोखून धरण्याचा प्रयत्नाचं कुणीही समर्थन करणार नाही. पण त्याचबरोबर धरणग्रस्तांचे योग्य पुनर्वसन कसे लवकरात लवकर होईल यावरही भर द्यायला हवा. अन्यथा धरणे आणि आंदोलने ही साखळी दिवसेंदिवस भक्कम होत जाईल.'' (दै. सकाळ बुधवार ११ एप्रिल २००१ विश्वास पाटील यांचा लेख) हे त्यांचे उद्गार तितकेच सत्य आहे. याचे प्रत्यंतर आज अनेक दैनिक वर्तमान पत्रातून येणाऱ्या बातम्यावरून आपल्याला येते.

# परिशिष्ट १ : संदर्भ ग्रंथसूची


१) प्रा. डॉ. ठाकूर रवींद्र : कादंबरी - एक वाङमय प्रकार : काही मुद्दे, म. सा. प. संपा. वि. स. वाळिंबे अंक जुलै - सप्टेंबर १९९३.

२) पवार गो. मा. आणि मा. द. हातकणंगलेकर : मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप प्रकाशक - कल्पना मुद्रणालय, शिवपार्वती टिळक रोड, पुणे. पहिली आवृत्ती १९८६.

३) देशपांडे अच्युत नारायण : आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास, भाग पहिला. इ. स. १८७४ ते १९२०, व्हीनस प्रकाशन तपश्चर्या ३८१ क शनिवार पेठ पुणे ३० पहिली आवृत्ती ऑगस्ट १९५४ पुनमुद्रण जानेवारी १९६७ व मार्च १९७४.

४) डॉ. जोशी प्रल्हाद नरहर : मराठी वाङमयाचा विवेचक इतिहास, प्रकाशक - मनोहर यशवंत जोशी प्रसाद प्रकाशन १८९२ सदाशिव पेठ पुणे ३० प्रथमावृत्ती जानेवारी १९७९.

५) प्रदक्षिणा खंड दुसरा : स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा, प्रकाशक अ. अ. कुलकर्णी कॉन्टिनेंटल प्रकाशन विजयनगर पुणे ३० आवृत्ती पहिली १९९१.
संपादक